MO.9860898564

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक - दिपक थोरात

## आष्टीत आज होणाऱ्या शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या सभेस मोठ्या संख्येने उपस्थित रहावे - अविनाश तळेकर

आष्टी ।प्रतिनिधी

महाविकास आघाडीचे आष्टी विधानसभा मतदारसंघाचे उमेदवार महेबुब शेख यांच्या प्रचारार्थ उद्या शनिवार दि ९ नोव्हेंबर रोजी दुपारी २ वाजता आष्टी येथील ईदगाह मैदान येथे माजी केंद्रीय मंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अध्यक्ष शरदचंद्रजी पवार यांची जाहीर सभा होणार असून सर्वांनी या सभेस मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन युवक राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी कार्याध्यक्ष आष्टी तालुका अविनाश दादा तळेकर यांनी केले आहे. आष्टी विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचे उमेदवार महेबुब शेख यांनी आष्टी विधानसभा मतदारसंघ पिंजून काढला असून सर्व सामान्य नागरिकांचा त्यांना मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळत आहे. सदरील निवडणूक ही जनतेने हातात घेतली असल्याने महेबुब शेख यांचा विजय निश्चित झाला आहे. त्यांच्या प्रचारार्थ माजी केंद्रीय कृषिमंत्री तथा राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरदचंद्र पवार यांची आष्टी येथे शनिवारी दुपारी ३ वाजता जाहीर सभा होणार आहे. आष्टी विधानसभा मतदार संघातील महाविकास आघाडीचे सर्व पदाधिकारी, सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, कष्टकरी, युवक तसेच कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन युवक राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी कार्याध्यक्ष आष्टी तालुका अविनाश दादा तळेकर यांनी केले आहे.

बीड (महाराष्ट्र) सायं.दैनिक मराठी वर्ष -०२ अंक -५३ शनिवार दि.०९ नोव्हेंबर २०२४ आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ किंमत ३ रू । पाने ४

Beed (Maharashtra) Daily Evening MARATHI Year-02 Issue -53 SATURDAY DT.09 NOVEMBER 2024 RNI : MAHMAR/2023/83965 PRICE - 3 RUPEES PAGES - 4

## फुटका डोळा काजळाने झाकण्याचा प्रयत्न!

# जे पुतण्याचे झाले नाहीत ते प्रकाश सोळंके गोरगरीब जनतेचे काय होणार?

### आ.सोळंकेचा विकास म्हणजे बकरीचे शेपुट माशाही वारीना अन् लाज पण झाकेना

### विकासाची वाट लावुन सहानुभूतीने निवडणुक जिंकण्याचा आ.सोळंकेचा प्रश्न!

### प्रकाश सोळंके म्हणजे कामापुरता मामा आणि ताकापुरती मावशी असे सोंगाडे दादा साठी धोक्याची घंटा तर.. पराभव अटल

माजलगाव/प्रतिनिधी

जरी नाहीतपेशवाईची वस्त्र अंगावर यावीत यासाठी रघुनाथराव पेशव्यांनी नारायणराव पेशव्यांचा घात केला होता. याच इतिहासाची पुनरावृत्ती माजलगाव मध्ये प्रकाश दादा सोळंके यांनी केली. आरक्षण आंदोलनात सोळंकेंची भूमिका वादग्रस्त ठरली.जे जातीचे झाले नाहीत पुतण्याचे झाले नाहीत ते गोरगरीब जनतेचे भलं कसं करणार? असा मतप्रवाह जनतेत बनल्याने प्रकाश दादांसाठी धोक्याची घंटा वाजू लागली आहे.

प्रचाराचा नारळ फोडून पुरुषोत्तमाच्या साक्षीने डोळ्यात अश्रू आणणाऱ्या प्रकाश सोळंके यांचे मगरीचे अश्रू म्हणून गणना होऊ लागली आहे.

प्रत्येक वादा मतदार संघाला भकास करणारा आहे.राजकारणी हा कलाकार असतो;रडून केलेलं कर्म धुण्याचा प्रयत्न करत जनतेला मूर्ख बनवायच असतं याच हातखंड्याचा वापर सोळंकेंनी केला.प्रत्येक वेळी मतदारांनी संधी दिली.यामुळे राजकीय अनुभवाने त्यांच्यात कोडगेपणा इतका आला की अक्षरशःभावनाच संपल्या गेल्या. विकासाची वाट लावत त्यांनी स्वतःची सरंजामशाही निर्माण केली. मात्र लोकशाहीत असं होत असतं असं म्हणून जनतेने प्रत्येक वेळी दिलेली संधी जनतेच्या विकासाला घातक ठरली. त्यांच्या याच कोडगेपणातून मराठा आरक्षण आंदोलनाच्या काळात सगळ्यात वादग्रस्त ठरलेलं व्यक्तिमत्व म्हणून आपली ओळख प्रकाश सोळंके यांनी निर्माण केली. समाजात त्यांच्या वागणुकीमुळे प्रचंड



चिडही निर्माण झाली. पण हा माझा शेवटचा कार्यकाळ आहे.असं म्हणून जनतेच्या मनात पेटलेली विरोधाची भावना त्यांनी शांत केली.

हे करताना प्रकाश दादांनी आपला नवा राजकीय डाव खेळत समाजात असलेली आग शांत करण्यासाठी पुतण्याचा वापर केला. आपला राजकीय उत्तराधिकारी जाहीरही करून टाकला. मात्र ऐनवेळी राजकीय सारीपाटावर चाली खेळत पुतण्याच्या पाठीत खंजीर खुपसत पेशवाईची आठवण करून दिली. पेशवाईत देखील पेशवाईची राज वस्त्र आपल्याला मिळावीत यासाठी रघुनाथराव पेशव्यांनी नारायणराव पेशव्यांचा असाच घात केला होता. आजही इतिहासाची पानं चाळली तर काका मला वाचवा ही हाक ऐकायला मिळते. नुसता काका मला वाचवाही हाक कानी पडताच महाराष्ट्राच्या जनतेच्या डोळ्यासमोर पेशवाई चा इतिहास उभा राहतो. धोका, दगाबाजी साठी हे उदाहरण आवर्जून आजही दिलं जातं. प्रकाश सोळंके च्या बाबतीत देखील धचा मा झाल्याचं पाहायला मिळालं.

जे प्रकाश दादा सोळंके प्रत्येक वेळी जनतेच्या भावनेशी खेळून त्यांची वाट लावण्यात वाकबगार झाले. ते कधी स्वार्थापुढे जनतेचे ही झाले नाहीत. स्वतःच्या जातीचे देखील झाले नाहीत. स्वतःच्या भावाने धैर्यशील सोळंके काकांनी त्याग करून प्रकाशदादांची पाठराखण केली.त्यांच्या मुलाच्या भवितव्य घडवण्याची वेळ आली त्यावेळी धाकट्या भावासोबतच पुतण्याच्या सोबत देखील दगाबाजी केली. एवढं करूनही धैर्यशील काकांनी धैर्याचा परिचय देत गप्प बसण्याचा मार्ग स्वीकारला. त्याचा परिणाम देखील प्रकाश सोळंकेवर यत्किंचितही झाला नाही. ते प्रकाशदादा माजलगावकरांच्या अंधारलेल्या वाटा म्हातारपणी म्हणे प्रकाशमान करणार आहेत. उमेदीच्या काळात मतदार संघाकडे त्यातील जनतेच्या भल्याकडे ढुंकूनही बघितले नाही. ते दादा आता शेवटच्या काळात जनतेचा भलं करणार आहेत. हे सांगूनही विश्वास कसा ठेवायचा? असा प्रश्न जनतेपुढे निर्माण झाला आहे. जातीचे न होणारे दादा, पुतण्याचे झाले नाहीत ते जनतेचे गोरगरिबांचे कसे होणार?

जाता जाता एकदा माजलगावची उरली सुरली सुद्धा वाऽऽट ते लावणार? असा मतप्रवाह सुरू झाल्याने प्रकाश दादांसाठी धोक्याची घंटा वाजू लागली आहे.

## संदीपभैय्यांच्या विजय निश्चितीसाठी पवार साहेब बीडमध्ये मुक्कामी

### सभेला मोठ्या संख्येने उपस्थित राहा-आ.संदीप क्षीरसागर

बीड ।प्रतिनिधी

बीड विधानसभा मतदार यांनीरसंघातून महाविकास आघाडीचे उमेदवार आ.संदीप क्षीरसागर यांच्या विजय निश्चिततेसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) चे अध्यक्ष, महाविकास व इंडिया आघाडीचे प्रमुख नेते खा.शरदचंद्र पवार साहेबांची बीड शहरात शनिवारी (दि.९) रोजी छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण येथे जाहीर प्रचार सभा होणार आहे. या सभेला मोठ्या संख्येने उपस्थित रहा असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात फूट पडल्यानंतर बीड जिल्ह्यात सगळे आमदार आणि पुढारी सत्तेत सहभागी झाले. परंतु जिल्ह्यात एकमेव निष्ठावंत आमदार संदीप क्षीरसागरांनी पवार साहेब व आपल्या पक्षाची साथ सोडली नाही. याच एकनिष्ठतेचे आणि



आपली भूमिका व विचार न सोडण्याचे फळ म्हणून आ.संदीप क्षीरसागर यांना दुसर्यांदा संधी मिळाली आहे. दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार), भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) व मित्रपक्षांची महाविकास आघाडी यांचे अधिकृत उमेदवार असलेले संदीप क्षीरसागर यांच्या प्रचारासाठी खा.शरदचंद्र पवार साहेबांची बीड शहरातील छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण येथे सायंकाळी ६:०० वाजता भव्य जाहीर सभा होणार आहे. या सभेला सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहा असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.

आ. संदीप क्षीरसागर यांनी केली सभा स्थळाची पाहणी शुक्रवार दि. ८ नोव्हेंबर रोजी सभास्थळी जावून स्वतः पाहणी करून नियोजनाचा आढावा घेतला. सभेचे नियोजनात कसलीही कसर राहणार नाही याची दक्षता स्वतः आ.संदीप क्षीरसागर घेत आहेत.

## रिपाइं पूर्ण ताकदीने डॉ.योगेश क्षीरसागरांच्या पाठीशी

### रिपाइंचे युवा प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांची ग्वाही; क्षीरसागरांची रिपाइं कार्यालयास भेट

बीड (प्रतिनिधी)

बीड विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना, भाजप, रिपाइं महायुतीचे उमेदवार डॉ.योगेश क्षीरसागर यांनी रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडियाच्या (आठवले गट) कार्यालयास शनिवारी (दि.१५) भेट देवून युवा प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांच्याशी चर्चा केली. यावेळी युवक प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्त्यांची बैठक झाली. या बैठकीत महायुतीचे उमेदवार डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या पाठीशी ताकद उभी करण्याचा निर्णय घेण्यात आला.

महायुतीचा प्रमुख घटक पक्ष म्हणून रिपाइं पूर्ण ताकदीनिशी




डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या पाठीशी उभी राहिल्याने डॉ.योगेश क्षीरसागर यांचे पारडे जड झाले आहे. या बैठकीस महायुतीचे उमेदवार डॉ.योगेश क्षीरसागर, रिपाइंचे युवा प्रदेशाध्यक्ष तथा जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे, राष्ट्रवादी काँग्रेस ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष कल्याण आखाडे, अल्पसंख्यांक सेलचे जिल्हाध्यक्ष इकबाल शेख यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी जैतुल्ला खान, नसीर अन्सारी, नगरसेवक प्रेम चांदणे, अशोक वाघमारे, आर.पी.आय.चे जिल्हा सरचिटणीस राजू जोगदंड, तालुकाध्यक्ष किसन तांगडे, युवक जिल्हाध्यक्ष महेश आठवले, युवक तालुकाध्यक्ष सुभाष तांगडे, शहराध्यक्ष अविनाश जोगदंड, युवक शहराध्यक्ष भैय्या मस्के, महेंद्र वडमारे, धम्मा पारवे, बापू पवार आदी उपस्थित होते. प्रभाकर चांदणे, मायाताई मिसळे, नवनाथ डोळस, राजाभाऊ वक्ते, भास्कर जावळे, मच्छिंद्र निकाळजे, रामेश्वर खळगे, दयानंद उबाळे, नामदेव वाघमारे, भिमराव घोडराव, अविनाश जोगदंड, विजय ओव्हाळ, श्रीमंत जाधव, कैलास जोगदंड, प्रा.आनंद मोरे, भैय्यासाहेब मस्के यांच्यासह रिपाइंच्या जिल्हा कार्यकारणीचे सर्व पदाधिकारी, सदस्य, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### डॉ.योगेश क्षीरसागर यांनी मानले आभार

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, भाजप, शिवसेना, रिपाइं., एस.आर.पी. व मित्रपक्षांच्या महायुतीचा बीड विधानसभेचा अधिकृत उमेदवार म्हणून रिपाइंचे युवक प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांनी मला जाहीर पाठींबा दिला. याबद्दल मी त्यांचे व त्यांच्या सहकाऱ्यांसह आर.पी.आय.पक्षाचे आभार व्यक्त करतो, अशी प्रतिक्रिया डॉ.योगेश क्षीरसागर यांनी व्यक्त केली.

## प्रस्थापितांना वैतागलेला गेवराईकर म्हणतोय, आता फक्त पुजाताईच!

प्रतिनिधी । गेवराई

प्रस्थापितांकडून होत असलेले तेच तेच राजकारण आणि एवढ्या वर्षात विकासच बघायला न मिळाल्याने वैतागलेले शेतकरी आणि सर्वसामान्य जनता यंदा गेवराई विधानसभेत परिवर्तन करण्याच्या तयारीत आहे, नवा आणि फ्रेश चेहरा, शिवाय शेतकरी आणि सर्वसामान्यांच्या कामाला नेहमीच उपलब्ध असणार्या पूजाताई मोरे यांना गेवराई मतदारांतून वाढता पाठिंबा मिळत आहे.

गेवराईचे राजकारण हे पंडित आणि पवार या भोवतीच फिरत आले आहे. या प्रस्थापित घराण्यांनी विकासाची खोटी आश्वासने देत आजवर लोकांच्या मतावर राज्य केले. प्रत्येक वेळी तेच तेच राजकारण आणि तेच तेच चेहरे बघून मतदार संघातील जनता वैतागली आहे. विशेष करून शेतकरी वर्ग आणि सर्वसामान्य या राजकारणाला आणि अविकसितपणाला कंटाळले असून, यंदा परिवर्तन घडवायचे असा संकल्प त्यांनी केल्याचे दिसत आहे. याचसाठी नवा पर्याय



### फडावर जात ऊसतोड कामगारांची घेतली भेट

**दौर्या दरम्यान पूजाताई मोरे यांनी उसाच्या फडात काम करीत असलेल्या ऊस कामगारांची भेट घेतली. ऊसतोड कामगारांच्या व्यथा आणि त्यांच्या समस्या यांची जाणीव पूजाताई मोरे यांना चांगल्या प्रकारे आहे. त्यांच्या हक्कासाठी सुद्धा त्यांनी यापूर्वी लढा दिलेला आहे. यावेळी ऊसतोड कामगारांनी पूजाताई मोरे यांचे कौतुकही केले. तुमच्या हक्कासाठी मी सदैव लढत राहणार असून, तुमच्या आरोग्यदायी जीवनासाठी, लेकरांच्या शिक्षणासाठी मी प्रयत्न करणार असल्याचे पूजाताई मोरे यांनी यावेळी सांगितले.**

म्हणून पूजाताई मोरे यांच्याकडे बघितले जाते. शेतकरी आणि सर्वसामान्य जनता याबाबत खुलेआम बोलू लागली आहे. यंदा परिवर्तन घडवायचेच आणि जे आपला प्रश्न लावून धरतील त्यांना निवडून द्यायचे, असा विचार मतदारांनी केला आहे. पुजाताई मोरे यांनी शेतकर्यांसाठी आजवर केलेले कार्य आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी उठविलेला आवाज जनतेला ठाऊक आहे. यामुळे त्यांच्या प्रचाराला सध्या प्रचंड मोठा प्रतिसाद मिळताना दिसतो आहे. शुक्रवारी पूजाताई मोरे यांनी मतदार संघातील टाकळगव्हाण, शिर्डी बुद्रुक, बाबुलतारा, टाकरवण, तपेलिमगाव, दत्तबाग, रामनगर, शेलगाव, रिधोरी, कवडगाव, सुर्डी नजीक, राजेगाव आदी ठिकाणचा दौरा करीत मतदारांच्या भेटी घेतल्या. या सर्वच ठिकाणचे शेतकरी आणि सर्वसामान्यांनी पूजाताई मोरे यांना भरभरून पाठिंबा देताना, आम्हाला बदल घडवायचा असून आम्ही तुमच्याच सोबत आहोत असे आश्वासित केले.

## ऑल इंडिया पँथर सेना पक्षाच्या अपक्ष उमेदवार नितीन सोनवणे यांचा प्रचाराचा झंझावात सुरू.!

बीड ।प्रतिनिधी

बीड मतदार संघाचे अपक्ष उमेदवार नितीन उत्तमराव सोनवणे यांनी बीड शहरातील सर्व महापुरुषांचा अभिवादन करून प्रचाराला सुरुवात करून प्रत्यक्षात मतदारांच्या गाठीभेटी घेण्यावर भर दिला आहे. गेल्या पाच सहा वर्षांपासून समाजसेवेत आपले वेगळे स्थान निर्माण करणारे गोरगरिबांची सेवा करून न्याय मिळवून देणारे दलित मुस्लिम आदिवासी व बहुजन यांच्या हक्कासाठी संघर्षाची लढाई लढणारे सोनवणे यांना मतदारांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. विकास करू म्हणून मताचा जोगवा मागणाऱ्या प्रस्थापित कुटुंबाने चाळीस वर्षे बीड मध्ये नगर परिषद, पंचायत समिती, जिल्हा परिषद सदस्य,आमदार, खासदार, सर्व पदे स्वतःच्या कुटुंबातच घेतले गेली तीस ते चाळीस वर्षे प्रस्थापित कुटुंबाने बीडच्या विकासाची विल्हेवाट लावली बीड मतदारसंघातील अल्पसंख्याक वॉर्डात रस्ते,नाली व पाण्याची सुविधा नाही.आता बीड मतदारांना एक सुवर्ण संधी आली आहे बीडचा विकास



करण्यासाठी नितीन सोनवणे यांना प्रचंड बहुमताने विजयी करून बीडचा विकास करण्याची द्यावी त्यांचे निवडणूक चिन्ह बॅट आहे आज मतदारांच्या भेट घेत असताना काही मतदारांनी त्यांना करीत असलेल्या कार्याचे कौतुक करून त्यांना आश्वासित केले व ग्रामीण भागातील मतदारांनी त्यांचे स्वागत केले तर उमेदवार नितीन सोनवणे कॉर्नर सभा घेत मतदारांची संवाद साधणार आहेत. एक ऊसतोड कामगाराचं लेकरू प्रस्थापितांच्या विरोधात लढत असलेल्या लढाईत मतदार राजा त्यांच्यासोबत आहे असे नागरिकांतून चर्चा आहे.यावेळी जन आशीर्वाद दौऱ्याची सुरुवात करताना तालुकाध्यक्ष कावेरी जाधव, तालुका संघटक पापाभाई शेख, तालुका उपाध्यक्ष निसार शेख, शहराध्यक्ष उमेश पारिख, शहर संघटक सोनीताई जांगडा, मिस्त्रीलाल जांगडा शहर संघटक, दिक्षा मिरपगार,सय्यद अदनान,व असंख्य कार्यकर्ते आदीसह बालाघाटावरील ग्रामीण भागातील मतदार बांधव उपस्थित होते.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा शाळा प्रवेश दिन महामानव अभिवादन ग्रुप व वाचाल तर वाचाल तर्फे विविध उपक्रमाने संपन्न

बीड ।प्रतिनिधी

७ नोव्हेंबर १९०० रोजी भीमराव रामजी आंबेडकर यांनी सातारा येथील सरकारी विद्यालयात इंग्रजी पहिल्या वर्गात प्रवेश घेतला होता, तो दिवस महाराष्ट्र शासन ७ नोव्हेंबर २०१७ पासून शाळा प्रवेश दिन, विद्यार्थी दिन म्हणून संपन्न करीत आहे. या दिनाचे औचित्य साधून महामानव अभिवादन ग्रुप व वाचाल तर वाचाल फिरते मोफत वाचनालयाच्या संयुक्त विद्यमाने बलभीम नगर बुध्द विहार (शिवाजीनगर) येथे शाळा प्रवेश दिन, विद्यार्थी व पालकांसमवेत विविध उपक्रमाने संपन्न केला. या कार्यक्रमास से.नि. शिक्षणाधिकारी सखाराम उजगरे अध्यक्षपदी लाभले तर प्रमुख पाहुणे म्हणून से.नि.सीईओ जि.प. बनसोडे पी.व्ही, से.नि.उपनिबंधक सहकार हनुमंत कांबळे, प्राचार्य सुशील गायकवाड, प्रा.बबीता गायकवाड प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते तर महामानव अभिवादन ग्रुपचे अध्यक्ष जी.एम.भोले, अॅड.राजेश शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कॅप्टन राजाभाऊ आठवले यांनी करुन महामानव अभिवादन ग्रुप व वाचनालय राबवित असलेल्या उपक्रमाबद्दल सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन अॅड.तेजस वडमारे यांनी केले. सर्व प्रथम तथागतास पुष्प तर प्रज्ञासूर्य भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर व माता रमाई यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पमाला अर्पण करुन विनम्र अभिवादन करण्यात आले. विद्यार्थी व पालकांशी हितगुज साधतांना आयु.पी.व्ही.बनसोडे म्हणाले की, आजची तरुण पिढी इंटरनेट व मोबाईलच्या मायावी जगातून बाहेर पडून ग्रंथाच्या सहवासात राहून त्यांचे वाचन, चिंतन व मनन करुन माणसाशी माणसाने माणसासारखे वागणे गरजेचे आहे व तसे आचरणात आणणे आणि पालकांनी पाल्यांना लहानपणीच चांगल्या सवयी लावणे अत्यंत महत्वाचे असून पालकांनी आपली गरीबी शिक्षणाच्या आड येवू न देता पाल्यास सुसंस्कारीत करणे हाच खर्या अर्थाने शाळा प्रवेश दिन साजरा केला असे म्हणता येईल. या प्रसंगी प्रा.बबीता गायकवाड व हनुमंत कांबळे यांनी विद्यार्थ्यांना व पाल्यांना अत्यंत सोप्या भाषेत जीवनातील पाल्याचे कर्तव्य व विद्यार्थ्यांची जबाबदारी अनेक उदाहरणाद्वारे समजावून सांगितली. शिकून पुढे गेलेल्यांनी समाजाचे आपण काही देणे लागतो या भावनेने निस्पृहपणे काम केले पाहिजे या बद्दल आग्रही मत मांडले व त्याकरीता वेळ व योग्य ती मदत करण्याचा निश्चय केला. शिक्षणातून वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण झाला पाहिजे व त्यानुसार अंधश्रध्देपासून दुर रहाणे कसे हिताचे आहे हे विद्यार्थ्यांना व पालकांना बौध्द महासभेचे शहराध्यक्ष अॅड.केतन गायकवाड यांनी स्पष्ट केले. शाळा प्रवेश दिनाचे औचित्य साधून महामानव अभिवादन ग्रुप तर्फे २६ विद्यार्थ्यांना शालेय साहित्य (वही-पेन) वाटप करण्यात आले व पुढील शिक्षणाकरीता शुभेच्छा दिल्या.



'वाचाल तर वाचाल फिरते मोफत वाचनालयातर्फे' प्रातिनिधीक स्वरुपात जान्हवी वाघमारे, प्रिती जाधव, समृध्दी सोनवणे, विश्वास शिंदे, निशांत वडमारे व अंजली विशाल वडमारे या विद्यार्थ्यांचा आणि बालिका आधीरा निळकंठ वाघमारे हिने बोबड्या भाषेत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या शाळा प्रवेश दिनाबद्दल माहिती दिली म्हणून या सर्वांना सावित्रीमाई फुले यांचे जीवन चरित्र पुस्तके देवून सत्कार करण्यात आला. तर ६ ज्येष्ठ महिलांनी विजुबाई अंकुटे, कमलबाई अंकुटे, संगमित्रा गायकवाड, शकुंतलाताई ससाणे, जयश्री वडमारे, संगीताबाई जाधव यांनी अनेक हाल-आपेष्ट सहन करुन आपल्या पाल्यास उच्च शिक्षणाची कास धरावयास लावली या बद्दल त्या सर्वांना महापुरुषांची जीवन चरित्र पुस्तके, पुष्पगुच्छ देवून मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. विशेष म्हणजे संदीपान निर्मळ यांची स्व:लिखित 'राजगृह' कविता संग्रह व डी.एम. राऊत यांनी बुध्द आणि त्यांचा धम्म हा ग्रंथ विहाराकरीता भेट दिला. लहानपणीच वाचनाची गोडी लागावी म्हणून वाचन संस्कृती वाढविण्याकरीता फिरते वाचनालयातर्फे ५० पुस्तकांचा संच परिसरातील विद्यार्थ्यांकरीता अॅड.तेजस वडमारे यांना मान्यवरांच्या हस्ते सुपूर्द करण्यात आला. पुस्तक वितरणाची जबाबदारी त्यांनी स्वयंस्फुर्त स्विकारली. अध्यक्षीय समारोपात अध्यक्ष महोदयांनी बदलत्या शिक्षण प्रणाली मध्ये होत असलेल्या बदला बद्दल पालकांनी व विद्यार्थ्यांनी काय काळजी घ्यावी या बद्दल सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमास पुण्यभूमीचे सुनील डोंगरे, सिध्दार्थ सूर्यवंशी, से.नि.केंद्र प्रमुख औसरमोल ए.एल., अमरसिंह ढाका, मीना आंकुटे, अर्चना जाधव, अंजली वडमारे, जयश्री गवळी, शिवकन्या खरमाडे, कोमल वाघमारे, आशा भालेराव व परिसरातील बहुसंख्य विद्यार्थी व पालकांची उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वी करण्याकरीता अॅड.केतन गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली प्रेम जोगदंड, राज जाधव, यश गवळी यांनी बहुमोल परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांना वाचनालयातर्फे अल्पोपहार देवून सरणात्तयने कार्यक्रमाची सांगता झाली.

# परळीत दुसऱ्या दिवशीही महायुतीच्या प्रचार फेरीस नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## परळीत धनंजय मुंडेच! अबाल वृद्धांचा विश्वास

परळी ।प्रतिनिधी

परळी विधानसभा निवडणुकीतील राष्ट्रवादी कॉंग्रेस व महायुतीचे अधिकृत उमेदवार धनंजय मुंडे यांच्या प्रचारार्थ परळी शहरातील महायुतीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी आज दुसऱ्या दिवशी काढलेल्या प्रचार फेरीसही नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. परळीच्या आपल्या हक्काच्या माणसाला निवडून द्यायचे... बाहेरचा कशाला? आजच्या प्रचार फेरीत एका वयोवृद्ध महिला मतदाराने आपली भावना व्यक्त केली. अबाल-वृद्ध नागरिकांमध्ये परळीत अशा चर्चा असून, आता फक्त



धनंजय मुंडेच! असा निर्धार शहरातील मतदारांनी केल्याचे दिसून येत आहे.

शहरातील पंचशील नगर,कंडक्टर कॉलनी, माधवबाग,लूंबीनी नगर,शारदा नगर,सोमेश्वर नगर,जलालपूर या भागात भव्य फेरी काढण्यात आली होती. यावेळी मतदार बंधू भगिनींनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत धनुभाऊंना सर्वाधिक मताधिक्य देवू हा विश्वास व्यक्त केला.प्रचार फेरीत राष्ट्रवादी,भाजप, शिवसेना,रि.पा.ई. व अन्य मित्र पक्ष महायुतीचे असंख्य पदाधिकारी-सहकारी उपस्थित होते.

# पवारसाहेब, मुस्लिमांना विधानपरिषदेत प्रतिनिधित्व देण्याचे पुढे काय झाले?

## बिलाल शेख यांचा पत्रकातून सवाल; मुस्लिम समाजाची मांडली भावना

बीड (प्रतिनिधी)

गत विधानसभा निवडणुकीत शरद पवार यांनी संदीप क्षीरसागर यांना विजयी करा मी मुस्लिम समाजाला विधान परिषदेत प्रतिनिधित्व देतो असे जाहीर आश्वासन दिले होते. परंतु त्या आश्वासनाचे पुढे काय झाले? असा सवाल आता मुस्लिम समाजातून उपस्थित केला जात आहे. याच अनुषंगाने बीड येथील मुस्लिम समाजाचे नेते बिलाल शेख यांनी प्रसिद्धपत्रक काढले आहे.

पत्रकात पुढे म्हटले आहे की, बीडमध्ये विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने २०१९ साली झालेल्या सभेत राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी तुम्ही संदीप क्षीरसागर यांना निवडून आणा, मी मुस्लिम समाजाला विधान परिषदेत प्रतिनिधित्व देतो असे जाहीर आश्वासन दिले होते. त्यामुळे माजी आमदार सय्यद सलीम यांच्या रूपाने परिषदेत मुस्लिम समाजाला संधी मिळेल अशी अपेक्षा होती. परंतु शरद पवार यांनी जाहीर सभेत दिलेला आश्वासन हवेत विरले. शरद पवारांचे एका शब्दावर विश्वास ठेवून मुस्लिम समाजाने एकगठ्ठा मतदान संदीप क्षीरसागर यांना केले होते. मात्र समाजाला गृहीत धरणाऱ्या राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने प्रतिनिधित्व दिले नाही. शरद पवार यांना मुस्लिम समाजाचे केवळ मतदान लागते, परंतु त्या समाजातून नेते मोठे करायचे नाही असं त्यांचं



धोरण आहे. या निवडणुकीत केवळ आष्टीतून मेहबूब शेख यांना संधी दिली. तो उमेदवार देखील मॅनेजर असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात होत आहेत. त्या जागेऐवजी माजी आमदार बाबाजींनी तुराणी यांना पात्री विधानसभा मतदारसंघातून संधी दिली असती तर नक्कीच ते विजयी झाले असते. अशाप्रकारे निवडून येण्याची शक्यता असणारा उमेदवार डावलून क्षमता नसलेल्या व्यक्तीला संधी द्यायची असे करणे कितपत योग्य आहे, असा प्रश्न आहे. तीन तलाख कायद्याबद्दल शरद पवारांची भूमिका काय होती? पैगंबर यांच्या बद्दल अपशब्द वापरणाऱ्या प्रती पक्षाने कधीही भूमिका स्पष्ट केली नाही. एनसीआर प्रश्न, रामगिरी महाराजांची भूमिका, नितेश राणे यांचे वक्तव्य, अशावेळी देखील पक्ष चूप राहिला. तुम्ही कधीच मुस्लिम समाजाची बाजू घेतली नाही, स्वतःला फक्त सेक्युलर दाखवून मुस्लिम समाजाचे मतदान पाहिजे. त्यामुळे येत्या २० तारखेला नक्कीच मुस्लिम समाज तुमच्या उमेदवाराला धडा शिकविल्याशिवाय शांत बसणार नाही, असा विश्वास मुस्लिम समाजाचे नेते बिलाल शेख यांनी व्यक्त केला आहे.

# माजलगाव विधानसभेचे महाविकास आघाडीचे उमेदवार मोहनराव जगताप यांचा विजय निश्चित

## शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते

माजलगाव ।प्रतिनिधी

विधानसभा महाविकास आघाडीचे उमेदवार मोहन दादा जगताप यांच्या प्रचारार्थ बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे व शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर व वडवणी तालुका प्रमुख विनायक बप्पा मुळे यांनी आज माजलगाव विधानसभा मतदारसंघातील सोन्ना थोटा, पिंपळटक्का, पिंपळा व चिखल बीड, चिंचवण गावांमध्ये कॉर्नर बैठका घेऊन मतदार बंधुशी संवाद साधला.

यांप्रसंगी बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे व शिवसेना



जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांनी गावोगावी मतदार बंधूंना संबोधित करत येणाऱ्या २० तारखेला तुतारी वाजवणारा माणूस या चिन्हासमोरील बटन दाबून मोहन दादा जगताप यांना मतदान रुपी आशीर्वाद देऊन प्रचंड मतांनी विजयी करा असे आवाहन केले.

यावेळी शेतकरी नेते गंगाभीसेनजी थावरे, राष्ट्रवादी माजलगाव विधानसभा अध्यक्ष नारायणजी डख, शेतकरी कामगार पक्षाचे मोहन भाई गुंड,जिल्हा संघटक रतन तात्या गुजर,प्रा. श्रीरामजी मुंडे, राष्ट्रवादीचे धारूर तालुकाध्यक्ष युवराज लगड, युवासेनेचे वडवणी तालुका युवाधिकारी नवनाथ मोरे, युवानेते एकनाथ पवार,अजय गायकवाड, महादेव महाराज खोटे, गणेश टिकुळे, रामेश्वर कदम,अशोक कदम,माधव बापू आंधळे,शुभम मस्के,महादेव भाऊ जमाले, मारोती मुंडे,पांडुरंग होंडे सह सर्व गावातील मतदार बंधू,भगिनी उपस्थित होते...!!

# संभाजी ब्रिगेड चे विजय दराडे यांचा पुरूषोत्तमास नारळ वाढवून प्रचार सुरू

माजलगाव ।प्रतिनिधी

माजलगाव मतदारसंघाचे संभाजी ब्रिगेड चे अधिकृत उमेदवार विजय दराडे यांनी आज दि ८ रोजी सायंकाळी ६ वाजता तालुक्यातील प्रसिद्ध असलेल्या पुरूषोत्तमपुरी श्री क्षेत्र पुरूषोत्तम भगवान यांच्या चरणी नारळ फोडून तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि साहित्य रत्न अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन करून प्रचार शुभारंभ केला. मागील बारा वर्षा पासून विजय दराडे यांनी अनेक छोटे मोठे प्रश्न सर्व सामान्य नागरिक यांचे कामे केलेली आहेत. विजय दराडे यांच मताधिक्य कुणाचं कंबर मोढनार अशी चर्चा मतदार संघात चालू आहे. मराठा आरक्षण,ओबीसी आरक्षण, शैक्षणिक प्रश्न,राशन प्रश्न,पीक विमा, शेतकरी योजना , ग्रामीण कामकाज,दवाखाना



अडचणी अश्या अनेक समस्या हजारो मतदार विजय दराडे यांच्या पाठीशी उभा असल्याचे दिसून येत आहे. संभाजी ब्रिगेड पूर्ण ताकतीने निवडणूक प्रचार करत असून मोठ मताधिक्य ब्रिगेड चे उमेदवार घेतील असे संकेत दिसत आहेत त्यांनी आपली संपूर्ण प्रचार यंत्रणा कामी लावून इतर उमेदवारा पेक्षा प्रचारात आघाडी घेतली असून ते विजयाच्या फार जवळ आहेत असा आत्मविश्वास कार्यकर्ते व्यक्त करत आहेत



## पाडळशिंगी शिवारात

# भरधाव कार डिवायडरला धडकली: दोन ठार

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : भरधाव वेगातील कार डिवायडरला धडकल्याने कारमधील दोन जण जागीच ठार तर तीन जण गंभीर जखमी झाल्याची घटना गेवराई तालुक्यातील पाडळशिंगी शिवारात घडली. मुदसीर अहमद सय्यद (वय ४०) आणि हमीद इब्राहिम सय्यद (वय ७०) दोन्ही (रा.अंधेरी वेस्ट मुंबई) अशी या अपघातात मृत्यू झालेल्यांची नावे असून, सबद सय्यद, इब्राहिम सय्यद, आईशा सय्यद अशी जखमींची नावे आहेत. सय्यद कुटुंबीय कारने सकाळी गेवराई कडुन बीडकडे राष्ट्रीय महामार्गावरून जात असतानाच कारचालकाचा ताबा सुटल्याने भरधाव वेगातील कार पाडळशिंगी शिवारात डिवायडरला धडकली. यात कार चालक मुदसीर सय्यद आणि हमीद सय्यद जागीच ठार झाले. तर अन्य तीन जण जखमी झाले.या अपघाताची माहीती मिळताच वाहतूक शाखेचे पोलीस आपघातस्थळी दाखल झाले. जखमींना बीडच्या जिल्हा रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले असल्याची माहीती वाहतूक शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक कापुरे यांनी सांगितले.

# विजयसिंह पंडित यांच्या प्रचारासाठी शिवछत्रचीवाघीण शितल साखरे मैदानात उतरली

## गेवराई तालुक्यात फक्त घड्याळाचा गजर होणार

गेवराई (प्रतिनिधी)

गेवराई विधानसभा मतदारसंघात महायुती व मित्र पक्षाचे उमेदवार विजयसिंह शिवाजीराव पंडित यांच्या प्रचारार्थ धोंडराईच्या सरपंच शितल साखरे यांनी ग्रामीण भागात प्रचाराच्या माध्यमातून गाव ,वस्ती, तंडे पिंजून काढले आहेत त्यामुळे शेताच्या बांधावर आणि घरांच्या दारावर जाऊन मतदारांच्या थेट -भेटी घेत शिवछत्र परिवाराने केलेल्या कार्याचा आढावा जनतेसमोर मांडत विजयसिंह पंडितांना लोकप्रतिनिधी म्हणून काम करण्याची संधी द्या. असे साकडे माय-बाप मतदारांकडे घातले आहे.

ग्रामीण भागातील प्रत्येक गावातून महिला पुरुषासह मतदारांचा प्रचंड प्रतिसाद मिळत आहे त्यांनी ग्रामीण भागात प्रचारातून चांगलीच भरारी घेतली आहे माजी आमदार अमरसिंह पंडितांची मानसलेक म्हणून त्या ओळखल्या जातात सविस्तर वृत्त असे की गेवराई विधानसभा मतदारसंघातील विधानसभेचा प्रचार आता शिगेला पोहोचला महायुती व मित्र पक्षाचे अधिकृत उमेदवार विजयसिंह पंडित यांचा विजय निश्चित होईल असा विश्वासही मतदार व्यक्त करत आहेत त्यामुळे एकच मतदारांनी निर्धार केला की विजयसिंह राजे साहेबांना विधानसभेत पाठवायचं ही निवडणूक सामान्य जनतेने हातात घेतली आहे मीच आमदार म्हणून सर्वजण कामाला लागले आहे शिवछत्र परिवाराने अनेक लोकहिताचे निर्णय घेतल्याने हजारो नागरिकांना फायदा झाला शिवछत्र परिवाराने कोरोना काळात तळागाळातील लोकांपर्यंत मदत केली आहे मात्र सत्ताधारी आमदारांनी सत्तेला चिकटून बसत कोरोना काळात कोणालाही मदत केली नाही ग्रामीण भागाच्या विकासासाठी अमरसिंह पंडितांनी भरपूर निधी खेचून आणला शिवछत्र परिवार नेहमीच काम करण्यासाठी कटिबद्ध आहे आणि लोकांच्या सुखदुःखात सहभागी होतात तसेच विविध भागातील गावभेट दौऱ्यात नागरिकांशी त्यांनी संवाद साधला.यावेळी त्या बोलत होत्या.

हजारो तरुणांच्या रॅलीत शितलताई आमची वाघिण

विजयसिंह पंडित विधानसभा सदस्य व्हावेत यासाठी तलवाडा येथील त्वरिता देवी मंदिराच्या समोर साकडे घालण्यासाठी गेवराई तालुक्यातून हजारो शिवछत्र परिवारातील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. याच मोटरसायकल रॅली काढण्यात आली यामध्ये एकमेव अशी एक रणरागिणी म्हणून शितल साखरे यांचे उपस्थिती लक्षवेधी ठरली. शिवछत्र परिवारातील हजारो सदस्य यांनी आयोजित केलेला हा साकडा महोत्सवात श्री.पृथ्वीराजे पंडित , श्री.रणवीर काका पंडित ,श्री दीपक तात्या आतकरे , सोमनाथ गिरगे, दादासाहेब माळी, स्वप्निल मोटे यांच्यासह अन्य मान्यवरांच्या संकल्पनेतून पार पडला यावेळी असंख्य शिवछत्र परिवारातील सदस्य उपस्थित होते.



# नितीन नाईकनवरे यांचा महाविकास आघाडीचे उमेदवार मोहन जगताप यांना जाहीर पाठिंबा

**माजलगाव ।सुनिल थोरात**

**माजलगाव मतदार संघामध्ये मोहन जगताप यांच्या कडे जोरदार इन्कमिंग चालू आहे त्यातच आणखी एक भर म्हणून माजलगाव मतदार संघामध्ये तगडा संपर्क आणि गोरगरिबांच्या सुखदु:खात धावून जाणारे कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती नितीन नाईकनवरे यांनी आज आपला पाठिंबा मोहन जगताप यांना जाहीर केलेला आहे.**

त्यांनी बोलताना सांगितले की माजलगाव मध्ये भाजप या पक्षाचा उमेदवार नाही आणि पक्षीय राजकारण बदलल्यामुळे मला हा निर्णय घ्यावा लागला सर्व कार्यकर्त्यांना विचारात घेऊन हा निर्णय घेतलेला आहे. तसेच विद्यमान आमदार प्रकाश सोळंके यांनी ३०७ सारखे गुन्हे दाखल करून निष्पाप तरुणांना देशोधडीला लावले बेघर केले अशा आमदाराला परत निवडून द्यायचे का असा सवाल त्यांनी या ठिकाणी उपस्थित केला.

भारतीय जनता पार्टीमध्ये मोहन दादा आणि मी सोबत काम केलं आणि दोघांच्या समन्वयाने मार्केट कमिटी लढवण्याचा प्रयत्न केला. अशा परिस्थितीमध्ये लोकांनी भरभरून साथ दिली आणि राजकारण करत असताना राजकारणामध्ये देवान घेवान करावी लागत आणि मग आत्ताची परिस्थिती अशी झाली की प्रकाश दादा बरोबर पंचवीस वर्षे काम केलं परंतु त्यांनी खुन्शी पनाचे राजकारण कधीच केले नव्हते. पण मागच्या पाच वर्षात त्यांना काय झालं काय माहित माझ्या भावाची बदली असेल आमच्या पोरा वरती केलेले गुन्हे असतील त्यामुळे या गोष्टीचा विचार करून आज आम्ही या निवडणुकीमध्ये आपले उमेदवार म्हणून जगताप यांना आपला पाठिंबा पूर्णपणे जाहीर करत आहे असे पत्रकार परिषदेमध्ये बोलताना सांगितले. यावेळी महाविकास आघाडीचे उमेदवार मोहन दादा जगताप यांना मतदान करून प्रचंड मताने विजय करण्याचे संकेत दिले यावेळी या कार्यक्रमास उपस्थित महाविकास आघाडीचे उमेदवार मोहन दादा जगताप,माजी आमदार बाजीराव भाऊ जगताप, भाई गंगाभिषण थांवरे, मानवी हक्क अभियानाचे नेते डॉ.मिलिंद आव्हाड, माजी नगराध्यक्ष सहाल चाऊस, नारायण अण्णा डक, अरुण इंगळे, कचरू तात्या खळगे, दयानंद भाऊ स्वामी, ड नारायण गोले व घटक पक्षांचे कार्यकर्ते व पत्रकार बांधव उपस्थित होते.



३०७ सारखे गुन्हे दाखल करून निष्पाप तरुणांना देशोधडीला लावणाऱ्या आमदाराला परत निवडून द्यायचे का-नितिन नाईकनवरे

## मतदानाचा हक्क बजावताना शाळा, आरोग्य, पिण्याचे पाणी, रस्ते , स्मशानभूमी आदी मुलभूत सुविधांसाठी उमेदवारांना जाब विचारावा:- डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश: विकसित भारतासाठी मतदान हे आवश्यक असुन मतदान जनजागृती काळाची गरज असुन महाराष्ट्र राज्य विधानसभा निवडणुक २०२४ निमित्ताने उत्सव निवडणुकीचा, अभिमान महाराष्ट्राचा या महाराष्ट्र शासनाच्या विशेष अभियानात सहभागी व्हावे यासाठी सर्वच मतदारांनी आवर्जून मतदान करावे.ग्रामस्थांनी मतदान प्रक्रियेतील महत्व आणि

त्यांचा सहभाग वाढविण्यासाठी मताचा टक्का वाढवा आणि मतदान आपला अधिकार आणि आपली जबाबदारी असुन याची जाणीव मतदारांना व्हावी.लोकशाहीच्या उत्सवात सहभागी व्हावे यासाठी बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील ग्रामस्थांनी गावच्या मुख्य प्रवेशद्वारावर बॅनर लाऊन मतदानाचा हक्क बजावा आणि हक्क बजावताना शाळा, आरोग्य, पिण्याचे पाणी, रस्ते, स्मशानभूमी सारख्या मुलभूत सुविधांसाठी मतदान मागण्यासाठी येणाऱ्या उमेदवारांना जाब विचारावा आणि.धर्म, जात पात,लिंग,भेद, विसरून मुलभूत सुविधांसाठी निर्भयपणे मतदान करावे असे आवाहन करण्यात आले. याचे आयोजन सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केले आहे.

मतदान आपला अधिकार आणि आपली जबाबदारी याची जाणीव ठेवून मतदान करताना निकोप आणि सुदृढ लोकशाहीसाठी धर्म,जात पात,लिंग भेद विसरून आपल्या गावातील जिल्हा परिषदेच्या शाळा, आरोग्य, पिण्याचे पाणी, रस्ते आणि स्मशानभूमी सारख्या मुलभूत प्रश्नांच्या अनुषंगाने मतदान मागण्यासाठी येणाऱ्या उमेदवारांना जाब विचारावा आणि निर्भयपणे मतदान करावे असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी केले.



# विनोद मुळूक डॉ.योगेश क्षीरसागर याच्यासाठी मैदानात!

बीड - डॉक्टर भारतभूषण क्षीरसागर यांचे कट्टर समर्थक तथा मागील वीस वर्षापासून बीड नगरपालिकेत नगरसेवक व सभापती पदावर कार्यरत असणारे माजी सभापती विनोद मुळूक हे डॉक्टर योगेश क्षीरसागर यांच्या विजयासाठी मैदानात उतरले असून शहरातील विविध भागात विनोद मुळूक यांचा मोठा जनसंपर्क आहे.तसेच प्रभागात केलेली विकास कामे या बळावर डॉक्टर योगेश क्षीरसागर यांच्या साठी विनोद मुळूक प्रचारात उतरले असून, योगेश क्षीरसागर च्या खांद्याला खांदा देत प्रचंड मताधिक्यांनी विजय करणार आहेत. विनोद मुळुक यांनी घेतलेल्या जबाबदारीमुळे योगेश क्षीरसागर यांचे ओझे नक्कीच कमी होणार असून शहरातील प्रभागात डोअर टू डोअर प्रचारात उतरले आहेत.महायुतीचे उमेदवार डॉक्टर योगेश क्षीरसागर यांना मतदारसंघात प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. शहरातही अनेक भागात त्यांच्या कॉर्नर बैठक आयोजित करण्यात येत आहे. शहरातील नगरपालिकेत गेली वीस वर्ष सक्रिय राजकारण करणारे माजी सभापती विनोद सक्रियपणे विधानसभा निवडणुकात पुढे आले असून डॉक्टर योगेश क्षीरसागर यांच्या पाठीशी खंबीरपणे साथ देण्यासाठी विनोद मुळूक पुढे आले आहेत. गेल्या अनेक वर्षाचा राजकीय अनुभव विनोद यांच्या पाठीशी असून या निवडणुकीत डॉक्टर योगेश शिरसागर यांना विनोद मुळूक यांच्या अनुभवाचा नक्कीच फायदा होणार आहे. शहरातील विविध भागात त्यांनी विकासात्मक कामे केलेली आहेत. कोट्यावधी रुपयांची विकास कामे केलेली आहेत. डॉक्टर भारत भूषण शिरसागर यांचे अत्यंत निकटवर्तीय अशी ओळख असणारे विनोद मुळूक मागील काही दिवसापासून सक्रिय राजकारणापासून अलिप्तच होते. डॉक्टर योगेश क्षीरसागर यांच्या रूपाने बीड विधानसभा मतदारसंघात उच्चशिक्षित उमेदवार लोकांची कामे करण्यासाठी तळमळ ठेवणाऱ्या व्यक्तीच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहण्याची भूमिका विनोद यांनी घेतल्यामुळे शहरात डॉक्टर योगेश क्षीरसागर यांचे पारडे जड झाले आहे. डॉक्टर योगेश क्षीरसागर यांच्या झंजावात विधानसभेत सुरू असून या निवडणुकीत त्यांना प्रचंड बहुमत मिळण्याची शक्यता आहे. यासाठी अनेक हात त्यांच्यासाठी काम करत असून शहरात योगेश क्षीरसागर यांना मोठी ताकद मिळाली आहे. विनोद मुळूक डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या पाठीशी प्रचंड ताकद उभा करणार असून येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत शहरातून मोठ्या प्रमाणात मत डॉ. योगेश क्षीरसागर यांच्या पारड्यात पडणार आहेत.विनोद मुळूक यांच्या भूमिकेची इतर नगरसेवक प्रतीक्षा करत होते.. आणखी बरेच नगरसेवक विनोद यांच्या संपर्कात असल्याचे विश्वसनीय सूत्र आहेत ते देखील लवकरच योगेश क्षीरसागराकडे प्रवेश करणार असल्याने विजय निश्चित असल्याचे मूलभूत यांनी सांगितले.



विनोद मुळूक त्यांच्यामुळे योगेश क्षीरसागराना शहरातून प्रचंड मताधिक्य मिळणार!

## गेवरावई व आमदार विजय राजेच होणार - सुमेध करडे, रवी मरकड

तलवाडा ।प्रतिनिधी

गेवराई तालुक्याचा पुढील आमदार विजयसिंह राजे पंडित होणार असून यात मात्र कसलेही तीळ मात्र शंका नाही गेवराई तालुक्यातील जनतेने रेकॉर्ड ब्रेक मताधिक्य विजयराजे यांना करावे व गेवराई तालुका विकास भिमुख करावा असे आव्हान विजय राजे पंडित कट्टर समर्थक सुमेध करडे, रवी मरकड यांनी प्रसिद्धी पत्रकात केले आहे

त्यांनी पुढे असे म्हटले आहे की, गेवराई तालुक्यातील जनतेसाठी नेहमी मदतीसाठी धावून आलेले आहे कोविड काळात दोन्ही पुढारी बंगल्यात असताना अशा वेळेस आईस लेकरू पारक असताना अचानक खूप भयावह काळ असताना माजी आमदार अमरसिंह पंडित साहेब तसेच विजय राजे पंडित तसेच शिवछत्र परिवारांनी जीवाची कसलीही परवा न करता कोविड सेंटर उभारून दोनशे घाटाचा वाढ तयार केला किती येणारा प्रत्येक पेशंट हा कुठला पक्षाचा आहे कसलाही विचार केला नाही अशा वेळेस तालुक्यातील पुढारी बंगल्यात असताना शिवछत्र परिवार हा कोविडच्या पेशंटची काळजी घेत होता तसेच शिव शारदा प्रतिष्ठानच्या मार्फत हजारो बहिणीचा संसार उभा करण्याचे काम शिवछत्र परिवाराने केलेले आहे त्यांनी गडी येथील जय



भवानी मंदिर या ठिकाणी सामूहिक विवाह सोहळा प्रत्येक वर्षी घेऊन संसार साहित्य वाटप करून शेकडो बहिणीचे संसार अमरसिंह पंडित विजय राजे पंडित यांनी उभे केले आहे विजयसिंह राजे पंडित यांचे कट्टर समर्थक सुमेध करडे रवी मरकड तलवाडा सर्कल मधील घरोघरी जाऊन विजयसिंह राजे यांनी केलेले कार्य मतदारांना सगात असून मतदारांचाही महायुतीला चांगला प्रतिसाद मिळत असून लाडकी बहीण योजने सारखे असे अनेक योजना याचाच फायदा विजय राजेंना होणार असून तालुक्याची निवडणूक ही एकतर्फी होताना दिसून येत आहे त्यामुळे कुठल्याही भूलथापांना बळी न पडता जो मदतीला नेहमी धावून येतो असे विजयसिंह पंडित यांना भरघोस मतांनी विजयी करून विधानसभेत पाठवा असे आव्हान सुमेध करडे माऊली नाना डोंगरे, रवी मरकड, राहुल आठवले, जीवन डोंगरे, सुदाम मोरे, यांनी केले आहे



**किल्लेधारूर / प्रतिनिधी**

**धारूर तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत पहाडी पारगाव येथै आद्य आदिवाशी क्रांतीकारक राघोजी भांगरे यांची जयंती अठरापगड समाजाचे वतीने जयंती साजरी करण्यात आली. आद्य आदिवाशी क्रांतीकारक राघोजी भांगरे यांना पहआडी पारगाव येथे विनम्र अभिवादन करण्यात आले त्यांचे कार्याविषयी माहीती आदिवाशी समाजाचे युवक कार्यकर्ते गोरख पुर्णे यानी आद्य आदिवासी क्रांतीकारक राघोजी भांगरे जयंती निमित्त विनम्र अभिवादन करत त्याचे जन्मा पासून चे कार्याची माहीती दिली. यावेळीसरपंच बालासाहेब अंडील यांच्या हस्ते जयंती साजरी करण्यात आले गोरख पुर्णे अनूसूचीत जाती जमाती धारूर तालूका: सर्व गावकरी उपस्थित होते**

# इमारत बांधकाम कामगार व इतर कामगारांच्या हक्कांसाठी नेहमी लढणार :- सोमेश्वर कदम

बीड ।प्रतिनिधी

येथील जुनी भाजी मंडी येथे आज सकाळी कामगारांशी संवाद साधत असताना महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अधिकृत उमेदवार सोमेश्वर कदम यांनी इमारत बांधकाम कामगार व इतर कामगारांच्या हक्कासाठी नेहमी लढणार असल्याचे आश्वासन दिले.

असे की,महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या माध्यमातून आम्ही इमारत बांधकाम कामगार व इतर कामगारांच्या विविध प्रश्नांसाठी नेहमी संघर्ष करीत आलो व यापुढेही त्यांच्या हक्कांसाठी आम्ही रस्त्यावर उतरून प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्नशील राहणार. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने नेहमी कामगारांच्या प्रश्नांना प्रथम स्थान दिले आहे



यापुढेही कामगारांच्या हक्कांसाठी लढत राहणार असल्याचे आश्वासन महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे उमेदवार सोमेश्वर राजकुमार कदम यांनी आज सकाळी १०:०० वाजता जुनी भाजी मंडी येथील कामगार भवन येथे उपस्थित राहून इमारत बांधकाम कामगार व इतर कामगारांच्या समस्या जाणून घेत कामगारांच्या हक्कांसाठी नेहमी लढणारा असल्याचे आश्वासन देऊन कामगारांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर चर्चा केली.

यावेळी उपस्थित सर्व कामगारांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे उमेदवार सोमेश्वर कदम यांनाच निवडून आणण्याचा निर्धार केला यावेळी मनसेचे सदाशिव अण्णा बिडवे (जिल्हा उपाध्यक्ष), करण लोंढे (शहराध्यक्ष), अमर जान पठाण (शहर संघटक ), ज्ञानेश कुलकर्णी (तालुका सचिव), इमरान खान (मनसे सैनिक), सिद्धेश्वर धोंडगे सह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# परळीत मराठा एकीकरणाची प्रक्रिया जोरात

## दलित. मुस्लिम. मराठा. फॅक्टर मुळे धनंजय मुंडे ची होणार आडचण

परळी ।प्रतिनिधी

परळी मतदारसंघातील आमच्या राज्याचे लक्ष लागलेल्या बीड जिल्ह्यातील परळी विधानसभा मतदारसंघातील लढती कडे असणार आहे. अजित पवाराच्या राष्ट्रवादी पक्षाची मुलुख मैदानी तोफ म्हणून ज्यांची ओळख आहे. त्यांच्या वकृत्यामुळे भल्या भल्यांची दमचक होते अशा धनंजय मुंडे विरुद्ध महाविकास आघाडीचे राजेसाहेब देशमुख यांच्यात लढत होत असून परळी विधानसभा होत असलेल्या मराठा समाजाच्या एक लाख मताचे एकीकरण करण्याची प्रक्रिया गाव पातळी पासून सुरू झाल्याने त्यातच शरद पवाराच्या राष्ट्रवादी काँग्रेस मागे लोकसभेप्रमाणे विधानसभेतील दलित मुस्लिम मराठा हा फॅक्टर उभा राहिल्याने धनंजय मुंडे ची मोठी अडचण होणार आहे. प्रचाराच्या रंग धुमाळे धनंजय मुंडे हे सभा गाजवत असले तरी मतदानाची किती गोळा बेरीज होते हे बघणे गरजेचे आहे. मराठा योद्धा मनोज जरांगे यांनी अपक्षांना पाठिंबा दिला नसता तरी त्यांचा अप्रत्यक्षपणे पाठिंबा आघाडीच्या उमेदवाराला मिळणार असल्याची चर्चा आहे. त्यामुळे धनंजय मुंडे यांना निवडणूक दिसते तशी सोपी नाही. हे तेवढेच खरे आहे. शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस मध्ये थोडा थोडा फोडाफोडी चा राजकारणात धनंजय मुंडे यांचे नाव अग्रेसर होते. ४० आमदारांपैकी बहुतास आमदारांना त्यानेच बोलून घेऊन अजित दादाच्या गटात समाविष्ट करण्यात भाग पाडले. शरद पवारांनी सुरुवातीपासूनच बीड जिल्ह्यातील परळी आणि गेवराई या दोन विधानसभा मतदारसंघात अजित दादा पवार यांच्या उमेदवाराकडे लक्ष दिले आहे. सुरुवातीपासूनच परळी मध्ये त्याने वेगवेगळे काढलं तपासून पाहिले. त्यात युवक चळवळीतून तयार झालेले नेतृत्व राजसाहेब देशमुख माकेगावकर यांना ते काँग्रेसमध्ये असतानाही राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवारी देऊन धनंजय मुंडे समोर मराठा कार्ड टाकले आहे. मनसे कडून उभी असलेले अभिजीत देशमुख यांनीही माघार घेतली आहे. तसेच राजभाऊ फड यांनी देखील माघार घेतली आहे. त्यामुळे आता थेट लढत धनंजय मुंडे विरुद्ध राजेसाहेब देशमुख यांच्यातच होणार आहे. त्यामुळे ही निवडणूक अत्यंत प्रतिष्ठेची होणार आहे. गेल्या पाच वर्षात धनंजय मुंडे यांनी बीड जिल्ह्यामध्ये अनेक विकास कामे व शिरसाळा सारख्या गावाला एमआयडीसी व आणण्याचे आश्वासन दिले होते परंतु आज पर्यंत एमआयडीसी चा प्रकल्प शिरसाळ्यामध्ये आलेला नाही याची नागरिकांमध्ये चर्चा होत आहे त्यामुळे दलित मुस्लिम मराठा व जारंगे फॅक्टर यांचे जर एक मत झाले तर धनंजय मुंडे यांना अवघड जाणार आहे. त्यातच राष्ट्रवादी काँग्रेसचे शरद चंद्र पवार यांची आज परळी येथे जाहीर सभा होणार आहे त्या सभेमध्ये शरद पवार हे परळी मतदारांसाठी कोणती गुगली सोडते थे वाट पाहणे गरजेचे आहे.





**माजलगाव (बातमीदार)**

**माजलगाव मतदारसंघाचे संभाजी ब्रिगेड चे अधिकृत उमेदवार विजय दराडे यांनी आज दि ८ रोजी सायंकाळी ६ वाजता तालुक्यातील प्रसिद्ध असलेल्या पुरूषोत्तमपुरी श्री क्षेत्र पुरूषोत्तम भगवान यांच्या चरणी नारळ फोडून तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि साहित्य रत्न अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन करून प्रचार शुभारंभ केला.**

**मागील बारा वर्षा पासून विजय दराडे यांनी अनेक छोटे मोठे प्रश्न सर्व सामान्य नागरिक यांचे कामे केलेली आहेत. विजय दराडे यांच मताधिक्य कुणाचं कंबर मोढनार अशी चर्चा मतदार संघात चालू आहे. मराठा आरक्षण,ओबीसी आरक्षण, शैक्षणिक प्रश्न,राशन प्रश्न,पीक विमा, शेतकरी योजना , ग्रामीण कामकाज,दवाखाना अडचणी अश्या अनेक समस्या हजारो मतदार विजय दराडे यांच्या पाठीशी उभा असल्याचे दिसून येत आहे. संभाजी ब्रिगेड पूर्ण ताकतीने निवडणूक प्रचार करत असून मोठ मताधिक्य ब्रिगेड चे उमेदवार घेतील असे संकेत दिसत आहेत त्यांनी आपली संपूर्ण प्रचार यंत्रणा कामी लावून इतर उमेदवारा पेक्षा प्रचारात आघाडी घेतली असून ते विजयाच्या फार जवळ आहेत असा आत्मविश्वास कार्यकर्ते व्यक्त करत आहेत**

# पाटोदा व जामखेड हद्दीत डी.जे. साऊंडचे साहित्य चोरी करणारी गँग स्थानिक गुन्हे शाखा,बीडने केली उघड

## ३ गुन्हे उघडकीस आणुन ६ आरोपी निष्पन्न करत १०,९५,०००/- डीजे साहित्याचा मुद्देमाल केला जप्त

**बीड ।प्रतिनिधी**
**पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ साहेब यांनी जिल्हयातील मालाविरुध्दचे गुन्हे उघडकीस आणण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखा,बीड येथील पो.नि.श्री. उस्मान शेख यांना दिले आहे. त्याअनुषंगाने पो.नि. श्री. उस्मान शेख यांनी आपल्या अधिनस्त पोलीस अधिकारी व अंमलदार यांना योग्य मार्गदर्शन केले आहे.**

फिर्यादी कल्याण संपत भाकरे , डी.जे.वाहन चालक रा.भाकरेवस्ती ता.पाटोदा यांचे वाहनाला लावलेले डी.जे. व साहित्य कोणीतरी अज्ञात व्यक्तीने चोरुन नेले होते.त्यावरुन पो.स्टे.पाटोदा येथे २९५/२०२४ कलम ३४१(१),३(५) भारतीय न्याय संहिता अन्वये दिनांक २७/१०/२०२४ रोजी गुन्हयाची नोंद झाली होती. दिनांक ०७/११/२०२४ रोजी सदर गुन्हयाचा समांतर तपास करीत असतांना पो.नि. श्री.उस्मान शेख यांना गुप्त बातमी मिळाली की, दगडी शहाजानपुर येथील सुरेश नवनाथ गायकवाड व त्याचे साथीदारांनी मिळुन चोरीचे डीजे साहित्य आणलेले आहेत. या खात्रीशिर बातमीवरुन वरुन पुढील तपास करण्यासाठी पोउपनि श्रीराम खटावकर व त्यांचे पथकास पाचारण करण्यात आले . त्यानंतर स्थागुशा पथकाने बातमीतील इसमाचा शोध घेण्यास सुरुवात केली नमुद इसम हा सम्राट चौक येथे उभा असल्याची



माहिती मिळताच त्यास ताब्यात घेवुन नाव विचारले असता त्याने त्याचे नाव सुरेश नवनाथ गायकवाड वय २२ रा.दगडी शहाजानपुर असे सांगितले. पथकाने त्यास डी.जे. चोरीच्या अनुषंगाने बारकाईने विचारपुस केली तेव्हा त्याने त्याचे इतर पाच साथीदारांसह डी.जे. साहित्य चोरी केल्याचे सांगितले. त्याचे इतर साथीदार पैकी अंबादास उर्फ अमोल अंकुश गायकवाड रा.शहाजानपुर ता.जि.बीड हा शहाजानपुर येथुन ताब्यात घेण्यात आला. दोन्ही आरोपीतांना अधिक विचारपुस केली असता त्यांनी आणखीन दोन ठिकाणी डीजे साहित्य चोरी केल्याची कबुली दिली. त्यावरुन १) पो.स्टे.पाटोदा गुरनं ३११/२०२४ कलम ३३४(१) बी.एन.एस. व पो.स्टे.जामखेड गुरनं ४७३/२०२४ कलम ३०५(ल) बी.एन.एस. असे दोन गुन्हे उघडकीस आलेले आहेत. स्था.गु.शा.पथकाने आरोपींकडुन त्यांचे ताब्यातील चोरीचे डी.जे. साहित्य एकुण १०,९५,०००/- रु चा मुद्देमाल जप्त केला असुन उर्वरित चार आरोपींचा शोध घेणे चालु आहे. सदरची कामगिरी मा.श्री. अविनाश बारगळ पोलीस अधीक्षक,बीड , मा.श्री. सचिन पांडकर अपर पोलीस अधीक्षक बीड, पोनि श्री. उस्मान शेख स्था.गु.शा.बीड, यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि श्रीराम खटावकर, पोह/मनोज वाघ,अशोक दुबाले, दिपक खांडेकर, सोमनाथ गायकवाड, बाळु सानप, अर्जुन यादव, नारायण कोरडे, अश्विनकुमार सुरवसे, असिफ शेख, चालक सिद्धार्थ मांजरे यांनी मिळुन केली आहे.पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ साहेब यांनी जिल्हयातील मालाविरुध्दचे गुन्हे उघडकीस आणण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखा,बीड येथील पो.नि.श्री. उस्मान शेख यांना दिले आहे.

# जनतेच्या आशिर्वादावर जिंकणार - विजयसिंह पंडित

## कॉर्नर बैठकांना आले जत्रांचे स्वरुप, ठिकठिकाणी जोरदार स्वागत

गेवराई ।प्रतिनिधी

महाराष्ट्रातील महायुती सरकारने जनतेच्या हिताच्या असंख्य योजना राबवून सर्वसामान्यांना त्याचा फायदा करून दिला आहे, शासकीय अनुदानाचा लाभ सर्वांपर्यंत पोहोचविला, विकासाच्या जोरावर व सर्वांच्या आशिर्वादावरच माझी लढाई आहे, मला तुमच्या एका-एका मताची अत्यंत आवश्यकता आहे, मतदार राजा मला यावेळी निश्चित साथ देईल असा आशावाद महायुतीचे उमेदवार विजयसिंह पंडित यांनी प्रचार बैठकांमधून व्यक्त केला. दरम्यान त्यांच्या ठिकठिकाणच्या बैठकांना अक्षरशः जत्रांचे स्वरुप प्राप्त होवू लागल्यामुळे विरोधकांची झोप उडाली आहे.

गेवराई विधानसभा मतदार संघातील विविध गावच्या प्रचार कॉर्नर बैठकांमधून मतदारांशी संवाद साधताना विजयसिंह पंडित म्हणाले की, मतदार संघातील जनता सुज्ञ आहे, विरोधकांनी कितीही जीवाचा आटापिटा केला तरी मतदार मायबाप आता भुलणार नाही. गेल्या दहा वर्षांत विरोधक कुठे होते ? याचा जाब मतदारांनी त्यांना विचारला पाहिजे. मी आणि माझा शिवछत्र परिवार सतत जनतेच्या सुख-दुःखात असतो. सरकारने जनकल्याणाच्या असंख्य योजना राबवून तळागाळापर्यंत जनतेला लाभ मिळवून दिला आहे, सर्वांसाठी तिजोरीची दारे खुली केलेली आहेत, अशा परिस्थितीत विरोधकांच्या फेकाफेकीला



मतपेटीद्वारे उत्तरे द्या असे सांगून शिवछत्र परिवाराने उभ्या आयुष्यात जातीपातीला कधीच थारा दिलेला नाही. उलट वंचित घटकाला सत्तेत वाटा मिळवून दिला आहे. आमचे राजकारण कधीही एका जाती धर्मापुरते मर्यादीत नाही आणि यापुढेही असणार नाही. सर्व समावेशक कामे करून सदैव विकासाला प्राधान्य दिलेले आहे. विकासाबाबत आपण कधीही तडजोड केलेली नाही, तीच भुमिका आजही आहे आणि कधी बदलणारही नाही. निवडणुकीची संधी साधून विरोधकांकडून मतदारांची दिशाभूल केली जात आहे, मला जाणीवपूर्वक अडचणीत आणण्याचे काम विरोधक करत आहेत. ही निवडणुक मी विकास कामांवर लढत आहे, मी विनाकारण कोणावर चिखलफेक करत नाही याची जाणीव मतदारांनी ठेवून येणाऱ्या मतदानाच्या दिवशी घड्याळ चिन्हासमोरचे बटन दाबून मला प्रचंड मताधिक्याने विजयी करा असे आवाहन त्यांनी विविध कॉर्नर बैठकांमध्ये केले.

# डॉ.योगेश यांच्याकडे सकारात्मक कामाची दृष्टी, त्यांनी कधीही गुंड प्रवृत्तीला थारा दिला नाही

## माजी नगराध्यक्ष डॉ.दिपाताई क्षीरसागर

बीड ।प्रतिनिधी

बीडचे महायुतीचे अधिकृत उमेदवार डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या प्रचारार्थ डॉ.दिपाताई क्षीरसागर यांनी कॉर्नर बैठकांचा धडाका लावला आहे. त्यांना प्रत्येक प्रभाग व वार्डावार्डातून भरघोस प्रतिसाद मिळत आहे. या प्रचारादरम्यान त्यांनी काझी नगर, बाळराजे नगर, झमझम कॉलनी आदी परिसरात बैठका घेतल्या. डॉ.योगेश यांच्याकडे सकारात्मक कामाची दृष्टी आहे. त्यांनी कधीही गुंडगिरी किंवा गुंड प्रवृत्तीला थारा दिला नाही, असे प्रतिपादन माजी नगराध्यक्ष डॉ.दिपाताई क्षीरसागर यांनी केले.

डॉ.दिपाताई क्षीरसागर म्हणाल्या, डॉ.योगेश हे उच्च विद्याविभूषित व्यक्तीमत्व असून त्यांच्याकडे विकासात्मक कामाची दृष्टी आहे. आजवर त्यांनी बीड विधानसभेच्या कार्यक्षेत्रात अनेक कामे केली. त्यामध्ये मोफत आरोग्य शिबीरांचे आयोजन, युवकांसाठी बेरोजगार मेळावे, वेगवेगळ्या क्रीडा



स्पर्धांचे आयोजन, गणेशोत्सव, शिवजयंती, दसरा-दांडिया महोत्सवाचे आयोजन यांसारख्या सांस्कृतिक, धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन त्यांनी केले. नेहमी सकारात्मक दृष्टिकोन ठेवून ग्रामीण आणि शहरी भागात विकास कसा होईल याकडेच लक्ष दिले. विकास हीच जात आणि विकास हाच धर्म या स्व.काकुंच्या शिकवणीनुसार डॉ.योगेश यांची वाटचाल सुरू आहे. आजवर अध्यक्षसाहेबांनी बीडच्या विकासासाठी नगरपरिषदेच्या माध्यमातून काम केले. आता त्यांच्या कार्याची धुरा योगेश यांनी आपल्या खांद्यावर घेतली आहे. बीड विधानसभेच्या सर्वांगिण विकासासाठी आपल्याला डॉ.योगेश यांना विधानभवनात पाठवायचे आहे, असेही त्या म्हणाल्या. त्या महायुतीच्या योजनांविषयी सांगितले. लाडकी बहीण, मुलींना मोफत शिक्षण, महिलांना मोफत गॅस सिलिंडर, मोफत प्रवास, शेतकऱ्यांना कर्जमाफी अशा सर्वांगिण विकासासाठी महायुती कटिबद्ध आहे म्हणून या निवडणुकीत महायुतीचे अधिकृत उमेदवार डॉ.योगेश क्षीरसागर यांना भरघोस मतांनी विजयी करा, असे आवाहन त्यांनी केले. या बैठकांना माजी नगरसेवक गणेश वाघमारे, शर्मा भाभी, काझी मुहम्मद साकीब, सोहेल, सय्यद झाकी, सादेक सिद्दिकी, हिना शेख, सय्यद फातेमा, झहिरा फातेमा, आशा वर्कर्स ग्रुप, धुतेकर, राजू, पुजारी आदींसह प्रभागातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आष्टी मतदारसंघात सुरेश धस यांची प्रचारात मुसंडी, गावोगावी जंगी स्वागत

पाटोदा ।आजीज शेख

आष्टी मतदारसंघात सुरेश धस यांनी प्रचारात मुसंडी मारलेली असुन अडचणीत धावुन येणाऱ्या सुरेश धस या नेत्याचे आष्टी पाटोदा शिरूर तालुक्यासह अंमळनेर,डोंगरकिन्ही,मानुर जिल्हा परिषद गटात गावोगावी जंगी स्वागत करण्यात आले असुन सर्व सामान्यांची कामे करण्यासाठी व मतदार संघाचा विकास करण्यासाठी मला निवडून द्यावे असे प्रतिपादन सुरेश धस यांनी झंझावात दौऱ्यात केले. २३१आष्टी-पाटोदा-शिरुर का.विधानसभा मतदारसंघाचे भाजपा-शिवसेना- रि.पा.ई.(आ) आणि मित्र पक्षांचे अधिकृत उमेदवार म्हणून सुरेश धस यांनी अंमळनेर,डोंगरकिन्ही,मानुर गटातील गावभेट दौऱ्यात ते बोलत होते. शिक्षण व आरोग्य हे आपल्या सर्वांसाठी महत्त्वाचं आहे.उदात्त हेतूने शिक्षणाला पुढील अशा पद्धतीने सगळ्या सुविधा देणे हे लोकप्रतिनिधीची जबाबदारी घेऊन ती मी पूर्णपणे या ठिकाणी पार पाडली.हा डोंगराळ भाग असल्याने शेतकऱ्यांना रानडुकराचा या परिसरामध्ये खूप मोठा त्रास होता.याचा बंदोबस्त करण्याचा देखील अनेक वेळा प्रयत्न केला आणि तो यशस्वी देखील झाला.शेतकरी डुकराच्या होणारा त्रासाला वैतागलेला आहे हे त्यांच्या बोलण्यातून दिसून येत असे त्यामुळे मी अनेक प्रयोग केले.असे अनेक विकास कामांसोबत प्रत्येकाच्या अडीअडचणीसाठी मी सदैव तत्पर राहिलो असून या व्यतिरिक्त जो तुमचे काम करत असेल तर आपण लोकशाहीमध्ये आपल्याला अधिकार आहे तो अधिकार आपण त्या पद्धतीने बजावावा अशी भावनिक साद महायुतीचे उमेदवार सुरेश धस यांनी मतदारांना केली.

आष्टी मतदार संघातील अंमळनेर,डोंगरकिन्ही व मानुर सर्कल मधील पांढरवाडी फाटा(गांधनवाडी, पांढरवाडी,संकुडवाडी) ,खडकवाडी,कोतन (बेदरवाडी),काकडहिरा,अमळनेर(उंडेवाडी, साबळेवाडी व पन्हाळकरवाडी, डागाचीवाडी, मिसाळवाडी, दौलतवाडी),निरगुडी (बेदरवाडी)पिंपळवंडी (अंबेवाडी,चंद्रेवाडी,



जरेवाडी,थोपटवाडी, सरदवाडी,नाकाडवाडी, हांडेवाडी)उखंडा,जाधववाडी (घोळेवाडी, गायकवाडी, भराटवाडी)पिट्ठी,पांगरी (पांगरी खालील पूर्ण वाड्या व वस्त्या), नायगाव,डोंगरकिन्ही (डोंगरकिन्ही गाव अंतर्गत वाड्या व वस्त्या),रोहतवाडी (भक्ताचे गोठे), कारेगाव (जन्नेवाडी, कंठाळवाडी),डोमरी (अंतर्गत सर्व वाड्यांसह वस्त्या),नाळवंडी (भाटेवाडी, वाड्या व वस्त्या),वड्झरी (सर्व वाड्यांसह वस्त्या),धसपिंपळगाव (तगारा,महेंद्रवाडी, सगळेवाडी) या गावांतील ग्रामस्थ व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. जाती धर्माच्या पलीकडे जाऊन कायम लोकांच्या मतदीला धावून जाणारे, त्यांच्या सुख दुःखात सहभागी होणारे एकमेक नेते सुरेश धस हे आहेत.आष्टी मतदार संघात त्यांच्या प्रचारात रथ विजयी वेगाने धावत असून दोनच दिवसात सुरेश धस यांनी प्रचारात मुसंडी मारली आहे ते ज्या गावात जातील तेथील लोक धस कुटूंब कायम आमच्या मदतीला धावून येतात. इतर नेते केवळ निवडणुकीच्या तोंडावर येतात,अशा बोलक्या प्रतिक्रिया देत सुरेश धस यांचे गावा- गावात जंगी स्वागत करत आहेत. सर्वत्र होत असलेल्या या स्वागताने सर्व जाती- धर्मातील लोक सुरेश धस यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याचे स्पष्ट होत आहे.




# अंबाजोगाईत सामुहिक श्रीसूक्त हवन योगेश्वरी मंदिरात महिलांचा मोठा सहभाग

अंबाजोगाई (प्रतिनिधी)
येथील माहेश्वरी महिला मंडळ व यज्ञ सेवा समितीतर्फे गुरुवारी (दि.७) सायंकाळी योगेश्वरी मंदिरात परमपूज्य यज्ञमार्तंड यज्ञेश्वर सेलूकर महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत सामुहिक श्रीसूक्त हवन झाले. यात महिला भाविकांनी मोठा सहभाग घेतला. सायंकाळी ५ वाजता यज्ञमार्तंड यज्ञेश्वर सेलूकर महाराजांचे आगमन झाले. आचमन, प्राणायाम, संकल्प व प्रार्थना होऊन या श्रीसूक्त हवनास प्रारंभ झाला. महाराजांच्या वाणीतून हवनाच्या मंत्रासोबत उपस्थित सर्व भाविकांनी प्रज्वलित केलेल्या अग्निकुंडात हवन केले. भक्तिमय वातावरणात एक तास हे श्रीसूक्त हवन सुरू होते.

**राष्ट्रभावनेची शिकवण - सोमराज**

अग्नी हे देवाचे मुख आहे. या यज्ञकुंडात आहुती देणे म्हणजेच देवाला जेवण देणे असेच असते. या श्रीसूक्त हवनाने आरोग्याबाबतच राष्ट्र भावना जोपासण्याची शिकवण दिल्याचे सोमराज सेलूकर यांनी सांगितले. या श्रीसूक्त हवनातील संस्कृत मंत्राचा अर्थ सांगून मानवजातीच्या आरोग्यासाठी ते महत्वाचे असल्याचेही ते म्हणाले.

सामुहिक श्रीसूक्त हवनासाठी लागणारे साहित्य व साधणे आयोजकांनी उपलब्ध केले होते. यात ४०० महिला व इतर भाविकांनी सहभाग घेतला. माहेश्वरी महिला मंडळ व यज्ञ सेवा समितीने सेलूकर महाराजांचे स्वागत केले. पेशवा महिला संघटनेतर्फेही महाराजांचा सत्कार झाला. अंबाजोगाई, योगेश्वरी मंदिर परिसरात यज्ञेश्वर महाराज सेलूकर यांच्या उपस्थितीत श्रीसूक्त हवन करताना महिला व पुरुष भाविक.अंबाजोगाई, माहेश्वरी महिला मंडळ व यज्ञ सेवा समितीतर्फे श्रीसूक्त हवनाचे मंत्रोच्चार कथन करताना यज्ञमार्तंड यज्ञेश्वर महाराज सेलूकर व सोमराज सेलूकर


हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT